बुधवार दि. ५ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३३५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जेष्ठन्नुता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

वाहतूक सुरू होण्यापूर्वीच रस्त्याला तडे!

# ढवळेश्वर रस्त्याच्या निकृष्ट कामावर कैलास गोरंट्याल संतप्त

## पावसात रस्त्याची खडी उघडी; कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह प्रकरण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निदर्शनास आणणार



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील राजूर चौफुली उड्डाणपुलापासून ढवळेश्वरकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्याच्या कामावरून नव्याने वाद निर्माण झाला असून, काम पूर्ण होण्यापूर्वीच रस्त्याला तडे जाणे, खडी उघडी पडणे आणि ठिकठिकाणी खड्डे निर्माण झाल्याचा आरोप करत माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी संबंधित कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. शासनाच्या निधीतून होत असलेल्या या विकासकामात निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचा आरोप करत त्यांनी संपूर्ण प्रकरणाची तांत्रिक चौकशी करण्याची मागणी केली असून हा विषय केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या निदर्शनास आणून देणार असल्याचेही स्पष्ट केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महानगरपालिका हद्दीतील हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून विकसित केला जात आहे. अद्याप रस्त्याचे काम पूर्ण झालेले नसताना आणि वाहतुकीसाठी अधिकृतपणे खुला होण्यापूर्वीच पावसामुळे अनेक ठिकाणी सिमेंटच्या पृष्ठभागावरील खडी उघडी पडल्याचे, सूक्ष्म तडे गेल्याचे तसेच काही भागात खड्डे निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे रस्त्याच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे.

आयुक्तांची भेट घेऊन केली चौकशीची मागणी

या पार्श्वभूमीवर माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी महानगरपालिका आयुक्तांची भेट घेत संबंधित रस्त्याच्या कामाची माहिती घेतली. कामाच्या गुणवत्तेबाबत सखोल तांत्रिक तपासणी करण्यात यावी, वापरण्यात आलेल्या साहित्याची गुणवत्ता तपासावी, काम करताना शासनाच्या निर्धारित निकषांचे पालन झाले आहे का याची पडताळणी करावी आणि दोषी आढळल्यास संबंधित कंत्राटदारावर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

''जनतेच्या पैशांचा अपव्यय खपवून घेणार नाही''

यावेळी बोलताना कैलास गोरंट्याल म्हणाले की, जनतेच्या करातून शासनाकडे जमा होणाऱ्या निधीतून विकासकामे केली जातात. त्यामुळे प्रत्येक काम दर्जेदार आणि टिकाऊ असणे अपेक्षित आहे. रस्ता पूर्ण

(पान २ वर)

# सुनेत्रा पवार यांच्यावरील कथित आक्षेपार्ह वक्तव्याचा राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीचा निषेध

## हर्षवर्धन सपकाळ यांनी माफी मागावी, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा; आज गांधी चमन येथे निदर्शने

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्याविषयी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कथितरीत्या केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी, जालना यांच्या वतीने तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे. या वक्तव्यामुळे महिलांचा सन्मान दुखावल्याचा आरोप करत संबंधित वक्तव्याचा जाहीर निषेध



करण्यात आला असून, आज (मंगळवारी) सकाळी १० वाजता गांधी चमन येथे निदर्शने करण्यात येणार असल्याची माहिती महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षा रिंकल तायड यांनी दिली.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात रिंकल तायड यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या कार्यशैलीमुळे स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या सुनेत्रा पवार यांच्याविषयी हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेले कथित वक्तव्य हे बिनबुडाचे, महिलांचा अवमान करणारे आणि राजकीय संस्कृतीला काळिमा फासणारे आहे. अशा प्रकारची भाषा सार्वजनिक जीवनातील व्यक्तींना शोभणारी नसून तिचा निषेध करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांचा सन्मान राखण्याचे आवाहन

निवेदनात पुढे म्हटले आहे की, महाराष्ट्राची परंपरा महिलांचा सन्मान करणारी आहे. कोणत्याही महिला नेत्या किंवा सार्वजनिक जीवनातील महिलांविषयी अवमानकारक भाषा वापरणे ही राज्याच्या संस्कृतीला शोभणारी बाब नाही. विरोधकांवर राजकीय टीका करणे हा लोकशाहीचा भाग

(पान २ वर)

# जालना –नांदेड समृद्धी महामार्गाच्या प्रलंबित जमीन अधिग्रहणाला गती

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे तातडीचे निर्देश

**मुंबई / जालना । प्रतिनिधी**

जालना- नांदेड समृद्धी महामार्गावरील अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या जमीन अधिग्रहणाच्या प्रश्नावर मंगळवारी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे विशेष आढावा बैठक घेण्यात आली. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुन



खोतकर यांनी जालना- नांदेड समृद्धी महामार्गासाठी प्रलंबित असलेल्या जमीन अधिग्रहण, बाधित शेतकऱ्यांचा मोबदला आणि स्थानिकांच्या विविध मागण्यांचा मुद्दा ठामपणे मांडला.

बैठकीत समृद्धी महामार्ग प्रकल्पातील सर्व अडचणी तातडीने दूर करून जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि विकासकामे रखडू नयेत, यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. ११२ हेक्टर क्षेत्रातील मोबदल्याचा प्रश्न केंद्रस्थानी बैठकीत जालना आणि घनसावंगी

(पान २ वर)

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'सक्षम कौशल्य जनगणना' कॉफी टेबल बुकचे प्रकाशन

**मुंबई - प्रतिनिधी**

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या 'सक्षम कौशल्य जनगणना' या अभिनव उपक्रमाच्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री मंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुंबई उपनगर चे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यावेळी उपस्थित होते.

'सक्षम कौशल्य जनगणना' हा मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेला देशातील पहिला एआय-सक्षम हायपरलोकल कौशल्य जनगणना उपक्रम आहे.

रोजगार, कौशल्य विकास आणि स्वयंरोजगाराच्या संधींसाठी सविस्तर कौशल्य डेटा तयार करण्याचा उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे ५९,८२४ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले असून ४४,९८२ उमेदवारांची नोंद, १,०१८ नियोक्ते आणि ५२ प्रशिक्षण संस्थांचा सहभाग नोंदविण्यात आला आहे. या सर्वेक्षणातून बेरोजगार, कौशल्यवृद्धी इच्छुक, स्वयंरोजगारासाठी इच्छुक; तसेच गृहिणींसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण माहिती संकलित करण्यात आली आहे.

'सक्षम कौशल्य जनगणना'मुळे उपजीविका आणि रोजगारनिर्मितीला नवी दिशा मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या 'सक्षम कौशल्य जनगणना' या अभिनव उपक्रमामुळे रोजगार, कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार क्षेत्रात महत्त्वपूर्ण परिणाम दिसून येत आहेत.

# जालना शहरात नो पार्किंग झोनची मागणी; वाहतूक कोंडीवर उपाययोजनांसाठी आयुक्तांना निवेदन

## *गांधी चौक ते मुक्तेश्वर द्वार, पाणीवेस, मोती मस्जिद, फुलबाजारसह प्रमुख मार्गांवर निर्बंध लागू करण्याची मागणी; फुटपाथ मोकळे करणे, एकेरी वाहतूक व पार्किंग व्यवस्थेचीही सूचना*

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील दिवसेंदिवस वाढत चाललेली वाहतूक कोंडी, अनियंत्रित पार्किंग आणि अपुऱ्या रस्ते नियोजनामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख रस्त्यांवर नो पार्किंग झोन जाहीर करण्याची मागणी पुढे आली आहे. यासंदर्भात महानगरपालिका आयुक्तांना सविस्तर निवेदन देण्यात आले असून शहरातील



वाहतूक व्यवस्था शिस्तबद्ध करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जालना शहराचा विस्तार मोठ्या वेगाने होत असला तरी शहरासाठी सन १९७४ नंतर कोणतेही व्यापक विकासात्मक नियोजन (डीपी) प्रभावीपणे राबविण्यात आलेले नाही. १९७४ मध्ये शनिमंदिर ते मुक्तेश्वर द्वार या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले होते. त्यानंतर शहरातील वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या आणि बदलत्या गरजांच्या तुलनेत आवश्यक त्या पायाभूत सुविधा विकसित झाल्या नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त

निवेदनानुसार, सुमारे २० वर्षांपूर्वी पाणीवेस ते मोती मस्जिद हा मार्ग एकेरी वाहतुकीसाठी घोषित करण्यात आला. मात्र, त्याला पर्यायी रस्ता आजपर्यंत तयार करण्यात आलेला नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर चौक ते टांगा स्टँड या मार्गावरही अशीच परिस्थिती असून वाहतूक नियमांचे पालन होत नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

(पान २ वर)

# संस्कार, आत्मचिंतन आणि धर्माचरणातूनच जीवनाची खरी उन्नती : महासती निर्मलाजी म.सा.

**जालना । प्रतिनिधी :**

''मनुष्याचे वर्तमान आणि भविष्य त्याच्या संस्कारांवर, विचारांवर आणि कर्मांवर अवलंबून असते. धन, वैभव आणि पद यामुळे नव्हे, तर सत्य, संयम, करुणा आणि धर्माचरणामुळेच मनुष्य महान बनतो,'' असे प्रतिपादन तपकौमुदी उपप्रवर्तिनी महासती निर्मलाजी म.सा. यांनी धर्मसभेत केले.

प्रवचनात त्यांनी सांगितले की, मनुष्याच्या जीवनाची पायाभरणी त्याच्या संस्कारांतून होत असते आणि संस्कारांची सुरुवात जन्मापूर्वीच गर्भावस्थेत होते. महाभारतातील अभिमन्यूचा प्रसंग याचे सर्वोत्तम उदाहरण आहे. अभिमन्यू आई सुभद्रा यांच्या गर्भात असताना श्रीकृष्णांकडून चक्रव्यूहात प्रवेश करण्याची विद्या ऐकली; मात्र त्यातून बाहेर पडण्याची पद्धत पूर्ण ऐकण्यापूर्वीच सुभद्रा निद्रिस्त झाल्या. त्यामुळे अभिमन्यूला चक्रव्यूहात प्रवेश करता आला, परंतु त्यातून बाहेर पडता आले नाही. हा प्रसंग गर्भसंस्कारांचे जीवनावर होणारे परिणाम अधोरेखित करणारा असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे गर्भवती महिलांनी सात्त्विक विचार, उत्तम साहित्य, धर्मश्रवण, सदाचार आणि सकारात्मक वातावरण यांचा स्वीकार करावा. आईचे विचार, आहार, आचरण आणि मानसिक स्थिती यांचा थेट परिणाम गर्भातील बाळाच्या संस्कारांवर होत असतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महासती निर्मलाजी म.सा. म्हणाल्या की, मनुष्याचे व्यक्तिमत्त्व त्याच्या विचारांवर आणि संगतीवर घडत असते. लोभ, क्रोध, अहंकार आणि हिंसा यांसारखे दुर्गुण अखेरीस व्यक्ती आणि समाजाच्या विनाशास कारणीभूत ठरतात. महाभारतात भगवान श्रीकृष्णांनी शांतिदूत म्हणून दुर्योधनाकडे जाऊन केवळ पाच गावे देण्याचा प्रस्ताव ठेवला होता; मात्र अहंकारामुळे दुर्योधनाने तोही नाकारला. परिणामी महाभारतासारखे भीषण युद्ध झाले आणि संपूर्ण कौरव वंशाचा विनाश झाला. अहंकाराचे दुष्परिणाम किती भयंकर असतात, याचा हा मोठा धडा असल्याचे त्यांनी सांगितले.

इतिहासातील उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, जगातील सर्व संपत्ती, सत्ता आणि वैभव याच जगात राहून जाते. जगज्जेता सिकंदरनेही मृत्यूपूर्वी आपले दोन्ही हात अर्थीबाहेर ठेवण्याची इच्छा व्यक्त केली होती, जेणेकरून जगाला समजावे की मनुष्य रिकाम्या हाताने येतो आणि रिकाम्या हातानेच निघून जातो. त्यामुळे भौतिक संपत्तीपेक्षा सद्कर्मांची संपत्ती अधिक महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी राणी पद्मिनी यांच्या त्याग, स्वाभिमान आणि धर्मनिष्ठेचा प्रेरणादायी प्रसंगही सांगितला. सतीत्व, स्वाभिमान आणि धर्मरक्षणासाठी त्यांनी जौहराचा मार्ग स्वीकारला; मात्र अधर्मापुढे कधीही झुकल्या नाहीत. त्यांचे बलिदान आजही भारतीय इतिहासात साहस, मर्यादा आणि धर्मनिष्ठेचे प्रेरणादायी उदाहरण म्हणून स्मरणात असल्याचे त्यांनी नमूद केले.

महासती निर्मलाजी म.सा. यांनी भगवान महावीरांच्या संदेशाचा उल्लेख करत सांगितले की, मनुष्याचा खरा धर्म बाह्य आडंबरात नसून अंतःकरणाच्या पावित्र्यात आहे. मनात अहंकार, ईर्ष्या, हिंसा आणि द्वेष भरलेला असेल, तर केवळ धार्मिक विधी करून आत्मकल्याण साध्य होत नाही. धर्म म्हणजे आत्मशुद्धी, सदाचार, समता आणि करुणेचा स्वीकार होय. प्रवचनाच्या शेवटी त्यांनी उपस्थितांना आवाहन केले की, प्रत्येकाने दररोज आत्मपरीक्षण करून आपल्या जीवनात दैवी

(पान २ वर)

# बँक कर्मचाऱ्यांवरील वाढत्या हल्ल्यांविरोधात संयुक्त बँक कर्मचारी संघटनांचा इशारा

## *सुरक्षिततेसाठी पोलीस संरक्षण, समन्वय बैठक, अतिरिक्त कर्मचारी भरती आणि राजकीय हस्तक्षेप रोखण्याची मागणी*

**जालना । प्रतिनिधी**

राज्यभरात बँक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर होणाऱ्या वाढत्या हल्ल्यांच्या घटनांमुळे बँकिंग क्षेत्रात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अशा घटनांना आळा घालण्यासाठी तातडीने कठोर उपाययोजना करण्याची मागणी संयुक्त बँक कर्मचारी व अधिकारी संघटनेने केली आहे. पत्रकार परिषदेत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनल्याचे सांगत शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली.




संघटनेने स्पष्ट केले की, बँक कर्मचारी शासनाच्या विविध आर्थिक आणि सामाजिक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत असतात. कर्ज वितरण, अनुदान, पेन्शन, शासकीय लाभ, जनधन, आधार संलग्नीकरण, डिजिटल व्यवहार आणि विविध आर्थिक योजनांची जबाबदारी बँकांवर असते. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले केवळ व्यक्तीवरचे हल्ले नसून संपूर्ण बँकिंग व्यवस्थेवरचा आघात असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

**संवेदनशील शाखांना पोलीस संरक्षणाची मागणी**

शासकीय योजनांच्या अंमलबजावणीदरम्यान किंवा मोठ्या प्रमाणावर गर्दी होणाऱ्या संवेदनशील बँक शाखांमध्ये पोलीस संरक्षण उपलब्ध करून द्यावे

(पान २ वर)

# संपादकीय...

## परिपत्रक कागदावर की प्रत्यक्षात?

### जालना मनपेतील हस्तक्षेपबंदीच्या आदेशाची खरी परीक्षा आता सुरू

जालना महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांनी नुकतेच जारी केलेले परिपत्रक हे केवळ प्रशासकीय आदेश नव्हते, तर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या एका गंभीर प्रश्नावर दिलेला स्पष्ट संदेश होता. नगरसेवक किंवा नगरसेविकांच्या नातेवाईकांनी महापालिकेच्या कामकाजात हस्तक्षेप करू नये, अधिकाऱ्यांना सूचना देऊ नयेत, स्वतःला लोकप्रतिनिधी असल्याचा आभास निर्माण करू नये आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींचे अधिकार वापरू नयेत, अशी स्पष्ट भूमिका या परिपत्रकातून मांडण्यात आली. या निर्णयाचे सर्व स्तरांत स्वागत झाले, कारण तो प्रशासनातील उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा मानला गेला.

मात्र, आदेश जारी झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच प्रभाग क्रमांक १६ मध्ये घडलेली घटना या परिपत्रकाच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ठरली आहे. मुसळधार पावसामुळे नागरिकांचे नुकसान झालेल्या भागाची पाहणी करताना संबंधित नगरसेवकांसोबत नगरसेविकेच्या नातेवाईकांचाही सहभाग दिसून आल्याची चर्चा सुरू झाली आहे. या भेटीदरम्यान नागरिकांना आश्वासने देण्यात आल्याचा दावा होत असल्याने, हा केवळ सामाजिक सहभाग होता की लोकप्रतिनिधीच्या भूमिकेचा आभास निर्माण झाला, हा प्रश्न आता महत्त्वाचा ठरतो. येथे एक गोष्ट स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. कोणत्याही नागरिकाला आपत्तीग्रस्त भागात जाण्याचा, मदत करण्याचा किंवा नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. लोकशाही व्यवस्थेत हे कुणीही करू शकते. परंतु जर एखादी व्यक्ती अधिकृत लोकप्रतिनिधीप्रमाणे आश्वासने देत असेल, अधिकाऱ्यांशी निर्देशात्मक संवाद साधत असेल किंवा प्रशासनावर प्रभाव टाकत असल्याचा आभास निर्माण होत असेल, तर ते आयुक्तांच्या परिपत्रकाच्या भावनेशी सुसंगत आहे का, हा मूलभूत प्रश्न निर्माण होतो. या प्रकरणात कोणताही निष्कर्ष गाठण्यापूर्वी वस्तुस्थितीची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे. केवळ छायाचित्रे, व्हिडिओ किंवा सोशल मीडियावरील चर्चांच्या आधारे कोणावरही ठपका ठेवणे योग्य ठरणार नाही. प्रशासनाने संपूर्ण घटनेची वस्तुनिष्ठ चौकशी करून नेमके काय घडले, कोणत्या भूमिकेत संबंधित व्यक्ती उपस्थित होत्या आणि परिपत्रकाचे उल्लंघन झाले का, याबाबत स्पष्ट भूमिका मांडणे आवश्यक आहे. कारण प्रशासनाची विश्वासार्हता ही केवळ आदेश काढण्यात नसून त्यांची समान आणि निष्पक्ष अंमलबजावणी करण्यात असते. या घटनेमुळे आणखी एक मोठा प्रश्न समोर येतो. परिपत्रक सर्वांसाठी समान आहे का? की त्याची अंमलबजावणी निवडक प्रकरणांपुरतीच मर्यादित राहणार? जर एखाद्या सामान्य कर्मचाऱ्याने आदेशाचे उल्लंघन केले तर त्याच्यावर तत्काळ कारवाई होते. मग लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांबाबतही तोच निकष लागू होईल का? कायद्याचे राज्य टिकवायचे असेल तर नियम व्यक्तीनुसार बदलता कामा नयेत. जालना महानगरपालिका प्रशासनाने हा निर्णय घेताना नागरिकांमध्ये एक सकारात्मक संदेश दिला होता. अनेक वर्षांपासून ''रिमोट कंट्रोल'' पद्धतीने चालणाऱ्या कथित हस्तक्षेपांवर नियंत्रण येईल, अधिकाऱ्यांवरील अनावश्यक दबाव कमी होईल आणि जबाबदारीची स्पष्ट रेषा आखली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. त्यामुळे आता पहिल्याच चर्चित प्रकरणात प्रशासनाने मौन बाळगले, तर परिपत्रक केवळ औपचारिक कागदपत्र ठरल्याची भावना निर्माण होऊ शकते. दुसरीकडे, लोकप्रतिनिधींनीही या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. जनतेने मतदान करून निवडून दिलेल्या व्यक्तीलाच अधिकृत अधिकार असतात. त्या अधिकारांचा वापर इतर कोणाकडून होत असल्याचा संदेश गेला, तर लोकशाही व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांनाच धक्का बसतो. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी स्वतःही अशा परिस्थिती टाळण्यासाठी काळजी घेणे आवश्यक आहे.

या संपूर्ण प्रकरणातून प्रशासनासमोर एक मोठी संधीही आहे. जर प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडली आणि आवश्यकतेनुसार समान निकषांवर निर्णय घेतला, तर आयुक्तांच्या परिपत्रकावरील विश्वास अधिक दृढ होईल. अन्यथा ''आदेश एक आणि अंमलबजावणी दुसरी'' अशी टीका अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## हिरव्या महाराष्ट्राचा संकल्प... विश्वसेवा फाउंडेशनचा हरित महायज्ञ

### वृक्षारोपण मोहिमेला शेकडो नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद;पर्यावरण संवर्धनाचा दिला बुलंद संदेश



**भोकरदन –प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनाचा वसा जपत विश्वसेवा फाउंडेशनच्या वतीने आयोजित वृक्षारोपण उपक्रमाला शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत हरित चळवळीला भक्कम साथ दिली.विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करून ''एक वृक्ष... अनेक पिढ्यांचे जीवन'' हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.या उपक्रमात युवक,महिला,ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत पर्यावरण रक्षणाची सामूहिक जबाबदारी स्वीकारली.उपस्थितांनी वृक्ष लागवडीबरोबरच त्यांच्या संगोपनाचीही शपथ घेतली.विश्वसेवा फाउंडेशनच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून,भविष्यातही अशाच हरित अभियानांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# पान १ व ४ वरुन...

### ढवळेश्वर रस्त्याच्या...

होण्यापूर्वीच त्याची अशी अवस्था होत असेल, तर संबंधित कामाच्या गुणवत्तेवर संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. केवळ काम पूर्ण झाल्याचे दाखविण्यासाठी घाईघाईने कामे करून नागरिकांच्या जीवाशी खेळ करण्याचा कोणालाही अधिकार नाही. निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

ढवळेश्वर रस्त्याच्या कामातील कथित त्रुटींचे संपूर्ण प्रकरण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निदर्शनास आणून देणार असल्याचे गोरंट्याल यांनी स्पष्ट केले. शासनाच्या निधीचा गैरवापर होत आहे का, कामाच्या गुणवत्तेची देखरेख योग्य पद्धतीने झाली का आणि संबंधित यंत्रणांनी बांधकामादरम्यान आवश्यक तपासण्या केल्या का, याबाबत त्यांनी उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्याचे संकेत दिले आहेत. या रस्त्याची अवस्था पाहता परिसरातील नागरिकांनीही नाराजी व्यक्त केली आहे. लाखो रुपयांचा खर्च करून उभारण्यात येणाऱ्या विकासकामांची गुणवत्ता सुरुवातीलाच संशयाच्या भोवऱ्यात सापडत असेल, तर शासनाच्या निधीचा योग्य वापर होत आहे का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. रस्ता वाहतुकीसाठी सुरू होण्यापूर्वीच तडे जाणे व खडी उघडी पडणे ही गंभीर बाब असल्याने संबंधित विभागाने तातडीने संयुक्त पाहणी करून दोष निश्चित करावेत, दोषींची जबाबदारी ठरवावी आणि आवश्यक दुरुस्ती करूनच रस्ता नागरिकांसाठी खुला करावा, अशी मागणी जोर धरत आहे. प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष या प्रकरणामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, संबंधित कंत्राटदार आणि प्रशासकीय यंत्रणेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता या आरोपांवर संबंधित विभाग काय स्पष्टीकरण देतो, तांत्रिक तपासणी केली जाते का आणि दोषी आढळल्यास कोणती कारवाई होते, याकडे जालना शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## जालना –नांदेड...

तालुक्यातील सुमारे ११२ हेक्टर क्षेत्रातील जमिनीच्या मोबदल्याचा प्रश्न प्राधान्याने चर्चेला आला. या भागातील अनेक शेतकऱ्यांच्या मोबदल्याचे प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याने त्याबाबत लवकर निर्णय घेण्याची गरज व्यक्त करण्यात आली. आमदार अर्जुन खोतकर यांनी बाधित शेतकऱ्यांना योग्य व न्याय्य मोबदला मिळावा, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. प्रकल्पामुळे प्रभावित शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांच्या प्रकरणांचा स्वतंत्रपणे विचार करण्याची विनंतीही त्यांनी केली.

**विभागीय आयुक्तांना निर्णयाचे निर्देश**

बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, बाधित शेतकऱ्यांनी आपल्या मोबदल्यासंदर्भातील प्रकरणे विभागीय आयुक्तांकडे सादर करावीत. त्यानंतर विभागीय आयुक्तांनी संबंधित प्रकरणांवर तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना न्याय आणि दिलासा द्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याची माहिती बैठकीनंतर देण्यात आली. साखर कारखाना वाचवण्यासाठी पर्यायी मार्गाचा विचार समृद्धी महामार्गाच्या प्रस्तावित सीमांकनात एका साखर कारखान्याची जागा येत असल्याने स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांनी वारंवार आंदोलने केली होती. या आंदोलनांची दखल घेत बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. संबंधित साखर कारखान्याची जागा प्रस्तावित मार्गातून वगळून पर्यायी मार्गाचा विचार करण्याचे निर्देश देण्यात आले. स्थानिकांच्या भावना आणि औद्योगिक हित लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. प्रशासनाला समन्वयाने काम करण्याच्या सूचना समृद्धी महामार्ग हा राज्यातील महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्प असल्याने त्यातील प्रलंबित प्रश्न लवकर निकाली काढण्यासाठी महसूल विभाग, एमएसआरडीसी आणि जिल्हा प्रशासन यांनी समन्वयाने काम करावे, असेही बैठकीत सांगण्यात आले. जमीन अधिग्रहणाशी संबंधित सर्व प्रकरणे वेळेत निकाली काढून प्रकल्पाच्या कामाला गती देण्यावर भर देण्यात आला. वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती या बैठकीला आमदार हिकमत उढाण, जालना जिल्हाधिकारी अशीमा मित्तल, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड तसेच महसूल, सार्वजनिक बांधकाम आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या जालनानांदेड समृद्धी महामार्गासाठी जमीन अधिग्रहणाचा प्रश्न अनेक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरला आहे. मोबदल्याबाबतची अनिश्चितता आणि सीमांकनासंदर्भातील आक्षेपांमुळे काही भागात काम रखडले होते. मंगळवारी झालेल्या आढावा बैठकीनंतर प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील आणि बाधित शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच साखर कारखाना वाचवण्यासाठी पर्यायी मार्गाचा विचार करण्याच्या निर्णयामुळे स्थानिक शेतकरी आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जालना शहरात...

शहरातील वाहनांची संख्या झपाट्याने वाढल्यामुळे प्रमुख रस्त्यांवर पायी चालणेही धोकादायक झाले आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आणि दिव्यांग नागरिकांना सर्वाधिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**या प्रमुख मागण्या केल्या**

१) गांधी चौक ते मुक्तेश्वर द्वार नो पार्किंग झोन

गांधी चौक ते मुक्तेश्वर द्वार या मुख्य मार्गावर सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत नो पार्किंग झोन लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या परिसरात नव्याने उभारलेल्या व्यावसायिक इमारतींना पार्किंगची व्यवस्था असल्याशिवाय परवानगी कशी देण्यात आली, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. संबंधित इमारतींमध्ये पार्किंगची जागा उपलब्ध असल्यास ती अतिक्रमणमुक्त करून प्रत्यक्ष वापरात आणण्यासाठी इमारत मालकांना नोटिसा देण्याची मागणीही करण्यात आली आहे. २) पाणीवेस मोती मस्जिद फुलबाजार मार्गावर चारचाकी वाहनांना बंदी पाणीवेस ते मोती मस्जिद तसेच मोती मस्जिद ते फुलबाजार या मार्गांवर चारचाकी वाहनांसाठी नो पार्किंग झोन लागू करावा, जेणेकरून अरुंद रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत होईल, अशी मागणी करण्यात आली आहे.

३) शिवाजी महाराज पुतळा ते जवाहर बाग मार्गावर निर्बंध

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जवाहर बाग या महत्त्वाच्या मार्गावरही चारचाकी वाहनांचे पार्किंग बंद करण्यात यावे, अशी सूचना निवेदनात करण्यात आली आहे. ४) सुभाष चौक ते मम्मादेवी मंदिर एकेरी वाहतूक सुभाष चौक ते मम्मादेवी मंदिर या मार्गावर एकेरी वाहतूक लागू केल्यास वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, असे मत निवेदनकर्त्यांनी व्यक्त केले आहे.

५) रेल्वे स्टेशन मार्गावरील फुटपाथ मोकळे करण्याची मागणी

मम्मादेवी मंदिर ते रेल्वे स्टेशन या रस्त्यावरील फुटपाथ अतिक्रमणमुक्त करून पादचाऱ्यांसाठी खुले करण्यात यावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे.

**पार्किंग धोरणाची गरज अधोरेखित**

निवेदनात शहरासाठी स्वतंत्र पार्किंग धोरण तयार करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. शहरातील व्यापारी संकुले, दवाखाने आणि व्यावसायिक इमारतींमध्ये मंजूर आराखड्यानुसार पार्किंगची व्यवस्था प्रत्यक्षात उपलब्ध आहे का, याची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

वाहतूक पोलिस आणि महापालिकेने संयुक्त कृती करावी

शहरातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी महापालिका, वाहतूक शाखा आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी संयुक्त कृती आराखडा तयार करून प्रमुख चौकांवर वाहतूक नियोजन, पार्किंग व्यवस्थापन, सीसीटीव्ही देखरेख आणि अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्याची गरज असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**प्रशासनाच्या निर्णयाकडे नागरिकांचे लक्ष**

शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि अनियंत्रित पार्किंग ही जालनेकरांसाठी मोठी समस्या बनली आहे. त्यामुळे आयुक्त या निवेदनाची कितपत दखल घेतात, प्रमुख मार्गांवर नो पार्किंग झोन लागू करण्याबाबत कोणते निर्णय घेतले जातात आणि शहरासाठी दीर्घकालीन वाहतूक नियोजनाचा आराखडा तयार होतो का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## बँक कर्मचाऱ्यांवरील...

अशी प्रमुख मागणी संघटनेने केली आहे. अनेक शाखांमध्ये अल्प मनुष्यबळावर मोठ्या प्रमाणात कामाचा ताण असून, त्यातून वाद निर्माण होण्याच्या घटना वाढत असल्याचेही संघटनेने निदर्शनास आणून दिले. जिल्हास्तरीय समन्वय बैठक घेण्याची मागणी

जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि लीड बँक व्यवस्थापक यांनी तातडीने संयुक्त बैठक घेऊन बँक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हास्तरीय कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी करण्यात आली. संभाव्य संवेदनशील शाखांची ओळख करून तेथे सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे, आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा कार्यान्वित करणे आणि आवश्यक तेथे पोलीस गस्त वाढविण्याची आवश्यकता संघटनेने व्यक्त केली. राजकीय हस्तक्षेप टाळण्याचे आवाहन बँक कर्मचारी किंवा अधिकाऱ्यांवर हल्ला करणाऱ्या समाजकंटकांना कोणत्याही स्तरावर राजकीय संरक्षण मिळू नये, अशी ठाम भूमिका संघटनेने मांडली. सर्व लोकप्रतिनिधींनी अशा घटनांचा जाहीर निषेध करून कायद्याच्या अंमलबजावणीला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. मनुष्यबळाची कमतरता गंभीर बँकांमध्ये दिवसेंदिवस ग्राहकांची संख्या वाढत असताना कर्मचारी संख्या मात्र अपुरी असल्याचे संघटनेने सांगितले. त्यामुळे ग्राहकांमध्ये नाराजी निर्माण होऊन अनेकदा कर्मचाऱ्यांशी वाद होतात. ही परिस्थिती टाळण्यासाठी तातडीने अतिरिक्त कर्मचारी भरती करावी, रिक्त पदे भरावीत आणि वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन बँक शाखा सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. कामाचा वाढता ताणही चिंतेचा विषय संघटनेच्या म्हणण्यानुसार, बँक कर्मचाऱ्यांवर नियमित बँकिंग सेवांबरोबरच शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी, डिजिटल सेवा, आर्थिक साक्षरता, कर्जविषयक कामकाज आणि इतर प्रशासकीय जबाबदाऱ्या वाढत आहेत. अपुऱ्या मनुष्यबळामुळे ग्राहकांना प्रतीक्षा करावी लागते आणि त्याचा रोष कर्मचाऱ्यांवर निघत असल्याचे संघटनेने नमूद केले. ''बँक कर्मचारी हे लोकसेवक आहेत'' पत्रकार परिषदेच्या शेवटी संयुक्त बँक कर्मचारी व अधिकारी संघटनेच्या वतीने स्पष्ट इशारा देण्यात आला की, ''बँक कर्मचारी हे जनतेचे शत्रू नसून लोकसेवक आहेत. नागरिकांना सेवा देणे हेच त्यांचे कर्तव्य आहे. त्यामुळे त्यांच्यावर होणारे हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत.'' अशा घटनांवर कठोर कारवाई झाली नाही तर राज्यव्यापी आंदोलनाचा विचार केला जाईल, असेही संघटनेने सूचित केले. प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष बँक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असताना जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि बँक व्यवस्थापन या मागण्यांवर कितपत सकारात्मक निर्णय घेतात, याकडे बँक कर्मचारी, अधिकारी आणि ग्राहकांचे लक्ष लागले आहे. सुरक्षित कार्यपरिसर उपलब्ध करून देणे ही केवळ कर्मचाऱ्यांची नव्हे तर अखंड बँकिंग सेवा सुरळीत ठेवण्यासाठीही अत्यावश्यक बाब असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## संस्कार, आत्मचिंतन...

गुण वाढवावेत आणि आसुरी प्रवृत्तींपासून दूर राहावे. सत्य, करुणा, क्षमा, संयम, सेवा आणि मानवता या मूल्यांचा अंगीकार केल्यास व्यक्तीचे जीवन यशस्वी होते आणि समाजातही शांतता, सद्भावना व नैतिकतेची जपणूक होते. धर्माचा खरा सार बाह्य दिखाऊपणात नसून श्रेष्ठ विचार आणि श्रेष्ठ आचरणात आहे. हाच खरा धर्म असून, हाच मनुष्यजीवनाच्या यशाचा आणि आत्मकल्याणाचा सर्वोत्तम मार्ग आहे.

या धर्मसभेला गुरुणीमैया महासाध्वी कौशल्याजी म.सा. श्रमणी यांच्या प्रशिष्य तथा स्वर्ण संयमज्योती उपप्रवर्तिनी महासती प्रमिलाजी म.सा. यांच्या सुशिष्य तपकौमुदी उपप्रवर्तिनी महासती निर्मलाजी म.सा., तपचंद्रिका महासती नंदिनीजी म.सा., महासती उपमाजी म.सा., महासती उपासनाजी म.सा. तसेच महासती ऋषिताजी म.सा. (आदि ठाणा ५) यांची पावन उपस्थिती लाभली. मोठ्या संख्येने श्रावक-श्राविकांनी धर्मश्रवणाचा लाभ घेतला.

## सुनेत्रा पवार यांच्यावरील...

असला, तरी वैयक्तिक पातळीवर अपमानास्पद वक्तव्ये करणे अयोग्य असल्याचे महिला आघाडीने स्पष्ट केले आहे. ''विकासाच्या मुद्द्यांवर राजकारण व्हावे'' राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, जनतेसमोरील महागाई, बेरोजगारी, शेती, पायाभूत सुविधा आणि विकास यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्याऐवजी महिला नेत्यांवर वैयक्तिक टीका करणे हे लोकशाहीच्या मूल्यांना धरून नाही. राजकारण हे विकास, जनकल्याण आणि लोकहिताच्या मुद्द्यांवर व्हायला हवे, अशी भूमिका महिला आघाडीने मांडली आहे. आज गांधी चमन येथे निषेध आंदोलन या प्रकरणाच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अरविंद रावजी चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आज सकाळी १० वाजता गांधी चमन येथे निदर्शने करण्यात येणार आहेत. या आंदोलनात पक्षाच्या विविध आघाड्या, सेलचे अध्यक्ष, शहर पदाधिकारी, महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन रिंकल तायड यांनी केले आहे. पक्ष संघटनेची एकजूट दाखविण्याचा प्रयत्न या आंदोलनाच्या माध्यमातून महिला सन्मानाचा मुद्दा पुढे आणत पक्षाची भूमिका जनतेसमोर मांडण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. संबंधित वक्तव्याबाबत काँग्रेस पक्षाने भूमिका स्पष्ट करावी आणि भविष्यात अशा प्रकारची भाषा वापरली जाणार नाही याची खबरदारी घ्यावी, अशी अपेक्षाही महिला आघाडीने व्यक्त केली आहे. राजकीय वातावरण तापण्याची शक्यता सुनेत्रा पवार यांच्यावरील कथित वक्तव्यावरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून विविध ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून निषेध व्यक्त केला जात आहे. जालन्यातील आंदोलनानंतर या विषयावर पुढील राजकीय घडामोडींकडे लक्ष लागले आहे.

## मुख्यमंत्री सहाय्यता...

आहे. त्याच भावनेतून प्रशांत इंगळे यांना वेळेत आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून देता आली, याचा आम्हाला आनंद आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

### भोकरदन तालुक्यातील...

याकडे निव्वळ दुर्लक्ष केले असून अजूनही कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. शासनाच्या या उदासीन कारभारावर तीव्र असंतोष व्यक्त करत युवा शक्ती ग्रुप खापरखेडा यांनी प्रशासनाला अंतिम इशारा दिला आहे. ''आमच्या लहान मुलांच्या भविष्याचा आणि सुरक्षेचा प्रश्न आहे. जर शासनाने या रस्त्याचे काम त्वरित सुरू केले नाही, तर खापरखेडा येथील नागरिक आणि लहान लहान विद्यार्थ्यांना सोबत घेऊन तहसील कार्यालयासमोर तीव्र ठिय्या आंदोलन करण्यात येईल,'' असा इशारा युवा शक्ती ग्रुपच्या वतीने देण्यात आला आहे. शासनाने व प्रशासनाने या गंभीर परिस्थितीची त्वरित दखल घेऊन खापरखेडा ते शाळा या रस्त्याचे काम तात्काळ सुरू करावे, अशी जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे.

### महावितरणकडून कायद्याचा...

ॲड. धनावत यांनी दिला आहे. महावितरणच्या या मनमानी कारभारावर आता मुख्यमंत्र्यांनी स्वतः लक्ष देऊन वीज ग्राहकांना दिलासा द्यावा, अशी मागणी संपूर्ण जिल्ह्यातून जोर धरत आहे.

## तृतीयपंथीयांच्या...

शिक्षण, स्वावलंबन आणि शासनाच्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले.कार्यशाळेच्या निमित्ताने तृतीयपंथीयांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये उपस्थितांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून आवश्यक आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला. तसेच आधार कार्डमधील नाव, पत्ता, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक आदी तपशील अद्ययावत करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. जिल्हा पुरवठा विभागामार्फत शिधापत्रिका (रेशन कार्ड) दुरुस्ती, नवीन नोंदणी, नाव समाविष्ट करणे तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीतील लाभांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्य विभागामार्फत पात्र लाभार्थ्यांना आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत आयुष्मान कार्ड काढण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे व उपलब्ध आरोग्य सुविधांविषयी माहिती देण्यात आली. याशिवाय, तृतीयपंथीय व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ अंतर्गत उपलब्ध कायदेशीर अधिकार, संरक्षणात्मक तरतुदी तसेच विविध शासकीय योजनांमधील लाभांविषयी सविस्तर कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसन करून त्यांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हरीदास भोपळे वरीष्ठ लिपीक व निलेश लक्कस कनिष्ठ लिपीक यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. अनिता राठोड सहायक आयुक्त समाज कल्याण जालना यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमती स्नेहल मोदाळे, विशेष अधिकारी, शासकीय निवासी शाळा, जालना यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहायक आयुक्त समाज कल्याण, जालना कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच राजाराम बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, वसुर, यांचे अध्यक्ष योगेश पाटील सहारा सामाजिक विकास संस्था, चांदई ठोंबरी यांचे अध्यक्ष सय्यद सर आणि गरु आशीर्वाद किन्नर समाज चॅरिटेबल ट्रस्ट, जालना तृतीयपंथीयांचे गुरु मोहम्मद शकीफ बक्ष (काजल गुरु नानी) पदाधिकारी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यशाळेच्या माध्यमातून तृतीयपंथीय समाजाला त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभघेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. या उपक्रमास तृतीयपंथीय समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.यावेळी कार्यक्रमास सहायक आयुक्त समाज कल्याण जालना कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## फॅक्टरी भाडे...

ऑनलाईन अर्ज:
mssidc.maharashtra.gov.in/RAMP/#/EOI
अधिक माहितीसाठी संपर्कः : अनिकेत शिवाजीराव डाके ९६९९६३७८२१, अनुज विजयकुमार ढवळे ९३५९७४७०११, : विशाल मधुकरराव इंगळे ७९७२७९०५३० जिल्हा उद्योग केंद्र जालना अंतर्गत कार्यरत बिझनेस फॅसिलिटेशन सेल/टीम यांच्याशी संपर्क साधून जिल्ह्यातील पात्र सूक्ष्म व लघु उत्पादन उद्योगांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी निर्धारित मुदतीपूर्वी ऑनलाईन अर्ज सादर करून शासनाच्या भाडे अनुदान योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## कुंडलिका नदीकाठ...

नदीकाठावर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यासोबतच अशा ठिकाणी सीसीटीव्ही, सूचना फलक आणि नियमित देखरेखीची व्यवस्था करण्याची गरज आहे. स्वच्छतेसह कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमींनी महापालिका प्रशासनाकडे तातडीने कचरा हटविण्याची मागणी केली आहे. देहेडकर वाडी परिसरातील नदीकाठाची विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, नियमित कचरा संकलनाची व्यवस्था करावी, कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी आणि भविष्यात पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होणार नाही यासाठी ठोस नियोजन करावे, अशी मागणी होत आहे. प्रशासनाच्या भूमिकेकडे नागरिकांचे लक्ष कुंडलिका नदीकाठावरील कचऱ्याचा प्रश्न हा केवळ अस्वच्छतेचा नसून सार्वजनिक आरोग्य, पर्यावरण संरक्षण आणि शहराच्या स्वच्छतेशी संबंधित गंभीर विषय बनला आहे. त्यामुळे महापालिका प्रशासन या समस्येची किती गांभीर्याने दखल घेते, तातडीने स्वच्छता मोहीम राबवते का आणि नदीकाठावर पुन्हा कचरा टाकला जाणार नाही यासाठी कोणत्या कायमस्वरूपी उपाययोजना करते, याकडे देहेडकर वाडीसह संपूर्ण जालना शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# जंक फूडवर बंदी : विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे पाऊल

महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) राज्यातील सर्व शाळांच्या ५० मीटर परिसरात जंक फूड विक्रीवर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शाळांच्या आजूबाजूला फास्ट फूड, शीतपेये, चिप्स, चॉकलेट, पॅकेज्ड स्नॅक्स आणि इतर आरोग्यास अपायकारक पदार्थांची सहज उपलब्धता विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी मोठा धोका ठरत होती. त्यामुळे हा निर्णय विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने अत्यंत स्वागतार्ह आहे.

आजच्या बदलत्या जीवनशैलीत मुलांचा कल घरगुती पौष्टिक आहारापेक्षा पिझ्झा, बर्गर, फ्रेंच फ्राईज, नूडल्स, चिप्स, सॉफ्ट ड्रिंक्स यांसारख्या पदार्थांकडे अधिक वाढला आहे. या पदार्थांमध्ये साखर, मीठ, तेल आणि कृत्रिम रंगांचे प्रमाण जास्त असल्याने लठ्ठपणा, मधुमेह, रक्तदाब, दातांचे विकार, पचनाचे आजार आणि इतर अनेक आरोग्य समस्या बालवयातच निर्माण होत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने () देखील बालकांमध्ये वाढणाऱ्या लठ्ठपणाबाबत वारंवार चिंता व्यक्त केली आहे.

शाळा हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र आहे. त्यामुळे शाळेच्या परिसरात आरोग्यदायी वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना पौष्टिक आहाराची सवय लागावी, यासाठी शाळांमधील कँटीनमध्ये सकस आणि संतुलित अन्न उपलब्ध करून देणे तितकेच महत्त्वाचे आहे. फक्त जंक फूडवर बंदी घालून हा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. त्यासाठी फळे, दूध, ताक, मोड आलेली कडधान्ये, ताजे फळांचे रस, पौष्टिक नाश्ता यांना प्रोत्साहन द्यावे लागेल.

या आदेशानुसार शाळांची नियमित तपासणी केली जाणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. हा निर्णय प्रभावी ठरण्यासाठी स्थानिक प्रशासन, शाळा व्यवस्थापन, पालक आणि विक्रेते यांचे सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा शाळेच्या गेटबाहेर हातगाड्यांवर किंवा छोट्या दुकानांमध्ये विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे पदार्थ विकले जातात. अशा विक्रेत्यांवरही प्रभावी नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

पालकांची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक पालक मुलांच्या हट्टापायी रोज खाऊसाठी पैसे देतात. त्याऐवजी घरातून पौष्टिक डबा देणे, संतुलित आहाराचे महत्त्व समजावून सांगणे आणि स्वतःही आरोग्यदायी जीवनशैलीचे उदाहरण ठेवणे आवश्यक आहे. मुलांमध्ये लहानपणापासून योग्य आहाराच्या सवयी रुजल्यास त्याचा सकारात्मक परिणाम आयुष्यभर दिसून येतो.

शाळांमध्ये पोषण शिक्षणावर भर देणे, संतुलित आहाराचे महत्त्व अभ्यासक्रमातून सांगणे, नियमित आरोग्य तपासणी करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये व्यायाम व मैदानी खेळांची आवड निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे. मोबाईल, टीव्ही आणि संगणकासमोर वाढणारा वेळ कमी करून शारीरिक हालचालींना प्रोत्साहन दिल्यास विद्यार्थ्यांचे आरोग्य अधिक सक्षम होईल.

मात्र, या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी हेच खरे आव्हान आहे. अनेक वेळा नियम तयार होतात; परंतु त्यांची काटेकोर अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे संबंधित विभागाने नियमित तपासणी, जनजागृती आणि दंडात्मक कारवाई यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. केवळ बंदी नव्हे, तर आरोग्यदायी पर्याय सहज उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आहेत. त्यांचे आरोग्य सुदृढ राहणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. जंक फूडवरील निर्बंध हा केवळ एक प्रशासकीय निर्णय नसून निरोगी पिढी घडविण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शासनाचा हा निर्णय प्रभावीपणे राबविला गेला आणि पालक, शिक्षक व समाजाने त्याला सकारात्मक साथ दिली, तर भविष्यात अधिक निरोगी, सक्षम आणि जागरूक पिढी घडण्यास निश्चितच मदत होईल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## जिल्हा स्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक संपन्न

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

अंमली पदार्थांचे सेवन, तस्करी व बेकायदेशीर व्यापार रोखण्यासाठी तसेच विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधण्यासाठी जिल्हा स्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती () ची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.



बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम., अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे उपअधीक्षक सचिन गाढवे, अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क, शिक्षण, न्यायवैद्यक प्रयोगशाळा, एमआयडीसी, पोलीस विभाग तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या शासन परिपत्रकानुसार तसेच दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार जिल्हा व तालुका स्तरावर अंमली पदार्थांविरोधात प्रभावी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. बैठकीत जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या प्रतिबंधासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. अंमली पदार्थांविरोधात सातत्याने कारवाई करून उत्पादन, वाहतूक, विक्री व सेवन यांना आळा घालण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी जिल्ह्यातील सुमारे ८०० शाळांमध्ये अंमली पदार्थांविरोधात जनजागृती अभियान राबविणे, नशामुक्त पंधरवाडा साजरा करणे, पथनाट्याच्या माध्यमातून वर्षभर जनजागृतीचे कॅलेंडर राबविणे, शाळा, महाविद्यालये व शासकीय कार्यालयांमध्ये अंमली पदार्थविरोधी शपथ घेणे, तसेच पोलीस पाटील मेळाव्यांद्वारे गावपातळीवर जनजागृती करण्याबाबत माहिती देण्यात आली.

शाळा व महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात अंमली पदार्थांवरील प्रतिबंधाची प्रभावी अंमलबजावणी, ई-सिगारेटचा वापर व विक्री प्रतिबंधित असल्याची जनजागृती, तसेच नागरिकांनी संशयास्पद हालचालींची माहिती नार्कोटिक्स हेल्पलाईन क्रमांक ९१७५७७७६४६ वर देण्याचे आवाहन करण्यात आले. यासाठी जनजागृतीपर स्टिकर्सही लावण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

## क्रांती पब्लिक स्कूलची अजिंठा लेणी येथे शैक्षणिक व निसर्ग सहल उत्साहात संपन्न



**वाळूज –प्रतिनिधी**

क्रांती पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली अजिंठा लेणी येथील शैक्षणिक तसेच निसर्ग सहल मोठ्या उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडली. या सहलीद्वारे विद्यार्थ्यांना जागतिक वारसा लाभलेल्या अजिंठा लेणींचा इतिहास, प्राचीन कला, स्थापत्यशैली आणि नैसर्गिक सौंदर्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली.

सहलीदरम्यान विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची, शिस्तीची आणि योग्य नियोजनाची विशेष काळजी घेण्यात आली. या यशस्वी उपक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका किरण जाधव, उपमुख्याध्यापिका हर्षमाला निकुंभ तसेच सहशिक्षक तुलसीदास मांडवे, स्वाती चळेकर, तबस्सुम शेख, भाग्यश्री स्वामी आणि रेशमा दिंडेलकर यांनी परिश्रमपूर्वक नियोजन करून सहल यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. विद्यार्थी व पालकांनीही या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. अशा शैक्षणिक सहलींमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडून इतिहास, संस्कृती आणि निसर्गाबद्दलची आवड अधिक वृद्धिंगत होते, असा विश्वास शाळा प्रशासनाने व्यक्त केला.

## चिखलातून विद्यार्थ्यांची 'शाळेची वाट'; पालकांना मुलांना उचलून न्यावे लागते!

### राजूरकर कोठ्यात अंतर्गत रस्त्यांची दयनीय अवस्था; पावसामुळे चिखलाचे साम्राज्य, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर



**घनसावंगी । प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होताच ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरवस्थेचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. घनसावंगी तालुक्यातील राजूरकर कोठा गावातील अंतर्गत रस्ते मुसळधार पावसामुळे अक्षरशः चिखलाच्या दलदलीत बदलले असून, या चिखलातून मार्ग काढत शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना रोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, अनेक पालकांना आपल्या लहान मुलांना चिखलातून उचलून शाळेपर्यंत नेण्याची वेळ आली आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे गावातील बहुतांश अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात चिखल साचला आहे. अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचल्याने रस्ते पूर्णपणे निसरडे झाले आहेत. परिणामी शाळकरी विद्यार्थ्यांना पायी चालताना मोठी कसरत करावी लागत आहे. चिखलामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या चपला रुतून बसतात, तर काहींना घसरून पडण्याचा धोका सतत निर्माण होत आहे. लहान मुलांना उचलून शाळेत नेण्याची वेळ गावातील अंगणवाडी आणि प्राथमिक शाळेत जाणाऱ्या लहान विद्यार्थ्यांना या चिखलातून चालणे शक्य नसल्याने पालकांना त्यांना उचलून शाळेत पोहोचवावे लागत आहे. शाळेत पोहोचेपर्यंत मुलांचे कपडे, दप्तर आणि पादत्राणे चिखलाने माखत असल्याने विद्यार्थ्यांनाही मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक पालकांनी सांगितले की, मुलांना शिक्षणासाठी नियमित शाळेत पाठविण्याची इच्छा असली तरी रस्त्यांची अवस्था पाहता दररोज भीती वाटते. एखादा विद्यार्थी घसरून जखमी झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. ग्रामस्थांची वारंवार मागणी, तरीही उपाययोजना नाही गावातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करावी, खडी टाकून तात्पुरती व्यवस्था करावी किंवा पावसाळ्यापूर्वी आवश्यक कामे पूर्ण करावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी संबंधित ग्रामपंचायत आणि प्रशासनाकडे अनेकवेळा केल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, अद्यापही कोणतीही प्रभावी उपाययोजना झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, पावसाळा सुरू होण्यापूर्वीच रस्त्यांची दुरुस्ती झाली असती तर आज विद्यार्थ्यांना अशा हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या नसत्या. शिक्षणावरही परिणाम रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे काही विद्यार्थी शाळेत उशिरा पोहोचत आहेत, तर काही पालक पावसाच्या दिवसांत मुलांना शाळेत पाठविणेच टाळत असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या नियमित शिक्षणावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिक्षणाचा हक्क केवळ शाळा उपलब्ध करून देण्यापुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे शाळेत पोहोचण्यासाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हीदेखील प्रशासनाची जबाबदारी असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम रस्त्यांची दुरवस्था केवळ विद्यार्थ्यांपुरती मर्यादित नसून शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दुचाकीस्वारांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चिखलामुळे अनेक ठिकाणी वाहने घसरत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. आजारी व्यक्तींना दवाखान्यात नेणेही कठीण बनल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

तातडीने दुरुस्तीची मागणी ग्रामस्थांनी संबंधित प्रशासनाकडे तातडीने राजूरकर कोठा गावातील अंतर्गत रस्त्यांची पाहणी करून चिखल हटविणे, खडी टाकणे, पाण्याचा निचरा करण्यासाठी व्यवस्था करणे आणि कायमस्वरूपी रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन युद्धपातळीवर उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्षराजूरकर कोठा येथील विद्यार्थ्यांना चिखलातून शाळेत जावे लागत असल्याचे चित्र ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांबाबत अनेक प्रश्न उपस्थित करत आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षण, सुरक्षितता आणि नागरिकांची गैरसोय लक्षात घेता संबंधित विभागाने तातडीने कारवाई करून रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आता प्रशासन या समस्येची किती गांभीर्याने दखल घेते आणि प्रत्यक्षात कामे कधी सुरू होतात, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### मुंबईत मृद व जलसंधारण विभागाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक

# आमदार अर्जुनराव खोतकर यांनी मांडले गंभीर मुद्दे, सखोल चौकशीची केली मागणी

**जालना । प्रतिनिधी**

मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री श्री. संजय राठोड यांच्या दालनात राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. शासनाच्या निर्देशानुसार अधीक्षक अभियंत्यांनी शासन स्तरावर सर्व आवश्यक मुद्द्यांची पूर्तता करून चौकशीनंतर खातरजमा झालेल्या कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.



या बैठकीस शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर उपस्थित होते. यावेळी त्यांनी संबंधित कामांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी, प्रशासकीय प्रक्रियेची सत्यता पडताळण्यासाठी आणि शासनाच्या निधीचा योग्य वापर सुनिश्चित करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण मुद्दे उपस्थित केले.

आमदार खोतकर यांनी सर्वप्रथम जिल्हा परिषदेला संबंधित कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार नेमका कोणत्या शासन निर्णय, नियम अथवा वित्तीय अधिकारांच्या आधारे देण्यात आला, याचा खुलासा करण्याची मागणी केली. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार कोणी आणि कोणत्या आदेशान्वये प्रदान केले, याची प्रमाणित कागदपत्रे सादर करण्याची मागणी त्यांनी केली. यासोबतच संबंधित प्रशासकीय मान्यता जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाद्वारे देण्यात आल्या आहेत का, असल्यास त्या ठरावाचा क्रमांक व दिनांक उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. प्रशासकीय मान्यतेचे आदेश सक्षम प्राधिकाऱ्यानेच निर्गमित केले आहेत की नाही, याची स्वतंत्र पडताळणी करण्याबरोबरच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून संबंधित आदेशांच्या सत्यतेबाबत लेखी अहवाल घेण्याची मागणीही त्यांनी केली. आमदार खोतकर यांनी जिल्हा परिषद, कृषी विभाग व जलसंधारण विभाग यांनी यापूर्वी केलेली कामे नव्याने केल्याचे दाखवून देयके काढण्यात आली आहेत का, याची विभागनिहाय चौकशी करण्याची मागणी केली. तसेच सर्व संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकारी व तांत्रिक पथकाच्या उपस्थितीत प्रत्येक कामाची प्रत्यक्ष स्थळपाहणी, मोजमाप आणि छायाचित्रांसह तपासणी करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

स्थळपाहणीदरम्यान जुनी व नवी कामे ओळखण्यासाठी जिओ-टॅग छायाचित्रे, मोजमाप पुस्तिका (एम.बी.), अंदाजपत्रके, कार्यारंभ आदेश आणि पूर्वी अदा करण्यात आलेल्या देयकांची परस्पर पडताळणी करण्याची मागणी त्यांनी केली. याशिवाय सर्व तालुक्यांतील देयकांवर एकाच कनिष्ठ अभियंता किंवा उपअभियंत्याच्या स्वाक्षऱ्या आहेत का, तसेच कार्यकारी अभियंत्यांच्या स्वाक्षऱ्यांबाबत संशय असल्यास त्यांची फॉरेन्सिक तपासणी करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

बोगस किंवा दुबार बिलांच्या माध्यमातून शासनाची आर्थिक फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदारांवर फौजदारी तसेच विभागीय कारवाई करण्याची मागणी आमदार खोतकर यांनी केली. प्रत्येक कामाची प्रशासकीय मान्यता कोणत्या अधिकाऱ्याने, कोणत्या अधिकारात आणि कोणत्या अभिलेखांच्या आधारे दिली, याचा कामनिहाय तपशील शासनाने सादर करावा, असेही त्यांनी नमूद केले. तसेच तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया, कार्यारंभ आदेश, मोजमाप पुस्तिका, गुणवत्ता अहवाल तसेच अदा झालेली व प्रलंबित देयके यांची विशेष लेखापरीक्षणाद्वारे तपासणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. संपूर्ण चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही संबंधित कामाचे देयक अदा करू नये आणि प्रलंबित देयकांना तात्काळ स्थगिती देण्यात यावी, अशीही भूमिका त्यांनी मांडली.

याशिवाय संबंधित कामांचे प्रशासकीय, तांत्रिक व आर्थिक दायित्व कोणत्या अधिकारी अथवा प्राधिकरणाने स्वीकारले आहे, याबाबत स्पष्ट लेखी स्पष्टीकरण देण्याची मागणी करण्यात आली. चौकशीची निष्पक्षता राखण्यासाठी जिल्हाबाहेरील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे स्वतंत्र पथक नियुक्त करून निश्चित कालमर्यादेत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशी मागणीही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी बैठकीत केली.

या बैठकीत राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत झालेल्या कामांची पारदर्शकता, निधी वितरणातील नियमबद्धता आणि शासनाच्या आर्थिक हिताचे संरक्षण यावर विशेष भर देण्यात आला. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांमुळे संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कुंडलिका नदीकाठ कचऱ्याने व्यापला; देहेडकर वाडीत दुर्गंधीचा कहर

## महापालिकेच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह; डास-माशांचा प्रादुर्भाव वाढल्याने आरोग्याचा गंभीर धोका

**जालना | प्रतिनिधी**

जालना शहराची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या कुंडलिका नदीच्या काठावर पुन्हा एकदा अस्वच्छतेचे विदारक चित्र समोर आले आहे. शहरातील देहेडकर वाडी परिसरात नदीपात्रालगत मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचल्याने परिसरात असह्य दुर्गंधी पसरली असून नागरिकांचे दैनंदिन जीवन त्रस्त झाले आहे. अनेक दिवसांपासून हा कचरा न उचलल्यामुळे डास, माशा आणि इतर कीटकांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाल्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या स्वच्छता विभागाच्या कार्यक्षमतेवर नागरिकांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, देहेडकर वाडी परिसरातील कुंडलिका नदीच्या काठावर घरगुती कचरा, प्लास्टिक, बांधकामातील टाकाऊ साहित्य तसेच इतर घनकचरा मोठ्या प्रमाणात टाकला जात आहे. हा कचरा अनेक दिवसांपासून तसाच पडून असल्याने त्याचे कुजून दुर्गंधीत रूपांतर झाले आहे. परिसरातून जाणाऱ्या नागरिकांना नाक मुठीत धरून जावे लागत असून जवळील रहिवाशांना दिवसभर दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.



पावसाळ्यात प्रदूषणाचा धोका अधिक गंभीर

सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात ही समस्या आणखी गंभीर बनली आहे. पावसाचे पाणी कचऱ्यात मिसळून थेट नदीपात्रात वाहून जात असल्याने नदीच्या पाण्याचे प्रदूषण वाढण्याची शक्यता आहे. प्लास्टिक आणि इतर घातक कचऱ्यामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहावर परिणाम होण्याबरोबरच जलचर सृष्टीवरही विपरीत परिणाम होऊ शकतो, अशी भीती पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे.

तक्रारी करूनही प्रभावी कारवाई नाही?

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नदीकाठावरील कचऱ्याबाबत महापालिका प्रशासन आणि संबंधित स्वच्छता विभागाकडे वेळोवेळी तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, या ठिकाणी नियमित स्वच्छता मोहीम राबविणे, कचरा उचलणे किंवा कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करणे याबाबत प्रभावी पावले उचलण्यात आलेली नाहीत, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

परिसरातील रहिवाशांचे म्हणणे आहे की, कचऱ्यामुळे डास व माशांचा प्रादुर्भाव वाढल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया तसेच इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

स्वच्छता मोहिमांवरच प्रश्नचिन्ह

एकीकडे महापालिका प्रशासन शहर स्वच्छतेसाठी विविध मोहिमा, जनजागृती उपक्रम आणि स्वच्छता अभियान राबवत असल्याचा दावा करत आहे. मात्र, शहराच्या मध्यवर्ती भागातील कुंडलिका नदीच्या काठावरच कचऱ्याचे ढीग साचत असल्याने या मोहिमांच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरातील महत्त्वाच्या नदीकाठाची अशी अवस्था असेल, तर इतर भागातील स्वच्छतेची परिस्थिती काय असेल, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

नदी संवर्धनाच्या प्रयत्नांना धक्का

कुंडलिका नदीचे संवर्धन, नदी स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणासाठी विविध स्तरांवर वेळोवेळी जनजागृती केली जाते. मात्र प्रत्यक्षात नदीकाठावरच कचरा टाकला जात असल्याने या सर्व प्रयत्नांना मोठा धक्का बसत आहे. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, नदीपात्रालगत कचरा साचल्याने भूजलावरही परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे *(पान २ वर)*

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण
## पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन

**मुंबई - प्रतिनिधी**

आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले. प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास




सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता. अशा कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला. या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून २०२६ रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै २०२६ रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत.

वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे आपल्याला नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त करत इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच टाटा ट्रस्ट यांचे मनःपूर्वक आभार मानले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार पैशांअभावी थांबू नये, या उद्देशाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत *(पान २ वर)*

# भोकरदन तालुक्यातील खापरखेडा येथे रस्त्याच्या दुरवस्थेमुळे विद्यार्थ्यांचे हाल; रस्ता न झाल्यास तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलनाचा युवा शक्ती ग्रुपचा इशारा

**भोकरदन -प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील खापरखेडा ते जिल्हा परिषद शाळा या दोन ते तीन किलोमीटर अंतराच्या रस्त्याची अत्यंत दयनिय अवस्था झाली असून, चिमुकल्या विद्यार्थ्यांना दररोज चिखल तुडवत शाळेत जावे लागत आहे. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासन तसेच लोकप्रतिनिधी या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. रस्ता तातडीने मंजूर करून दुरुस्त न केल्यास चिमुकल्यांना सोबत घेऊन तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा युवा शक्ती ग्रुप, खापरखेडा यांच्या वतीने देण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खापरखेडा येथील जिल्हा परिषद शाळेत पहिली ते



चौथीच्या वर्गात शिकणारे लहान लहान विद्यार्थी दररोज शिक्षणासाठी या रस्त्यावरून ये-जा करतात. पावसाळ्यात या दोन ते तीन किलोमीटरच्या रस्त्यावर सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरत असल्याने विद्यार्थ्यांना प्रचंड कसरत करत आणि चिखल तुडवत शाळा गाठावी लागते. अनेकदा लहान मुले चिखलात घसरून पडतात, ज्यामुळे त्यांचे कपडे व पुस्तके खराब होतात.


या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत ग्रामस्थ व युवा शक्ती ग्रुपच्या सदस्यांनी प्रशासनाला वारंवार निवेदने देऊन रस्त्याची डांबरीकरण किंवा खडीकरण करण्याची मागणी केली. एवढेच नव्हे तर स्थानिक आमदार, खासदार आणि जिल्हा परिषद सदस्यांनाही या समस्येबाबत सांगून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी *(पान २ वर)*

# महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट कामगिरीबद्दल नायब तहसीलदार कल्याणजी काळदाते यांचा सत्कार

**मंठा - प्रतिनिधी**

महसूल दिन २०२५-२६ निमित्त विविध महसूल उपक्रमांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मंठा येथील नायब तहसीलदार श्री. कल्याणजी काळदाते यांचा जिल्हाधिकारी यांच्या वतीने गौरव करण्यात आला.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नगरसेवक शेषनारायण दवणे आणि विशाल प्रधान यांनी श्री. काळदाते यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी नगरसेवक शेषनारायण दवणे आणि विशाल प्रधान म्हणाले की, ''एखाद्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने उल्लेखनीय यश संपादन



केल्यास त्याचा गौरव करून शुभेच्छा देणे अत्यंत आवश्यक असते. अशा शुभेच्छा आणि प्रोत्साहनामुळे अधिक जोमाने व जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा मिळते.'' सत्काराला उत्तर देताना नायब तहसीलदार श्री. कल्याणजी काळदाते म्हणाले, ''जिल्हाधिकारी यांच्या वतीने झालेला हा गौरव माझ्यासाठी सन्मानाची बाब आहे. या सन्मानामुळे माझ्यावर अधिक जबाबदारी आली असून भविष्यातही जनतेच्या हितासाठी प्रामाणिकपणे आणि अधिक कार्यक्षमतेने काम करण्याचा प्रयत्न करेन.''

यावेळी उपस्थितांनी श्री. काळदाते यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# महावितरणकडून कायद्याचा अवमान; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच ऊर्जा व कायदे खाते असल्याचा गैरफायदा: ॲड. महेश धनावत यांचा घणाघाती आरोप

**जालना | विशेष प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्याचे ऊर्जामंत्री आणि कायदा मंत्रीदेखील आहेत. मात्र, असे असतानाही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) कायद्याचा किंवा नियमांचा कोणताही आदर ठेवत नसल्याचा गंभीर आरोप जालना येथील ज्येष्ठ विधीज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते ॲड. महेश धनावत यांनी केला आहे. वरिष्ठ प्रशासनाला कायद्याचे भय उरले नसल्यानेच वीज ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर अडवणूक व छळवणूक सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**अवाजवी बिल आणि सेवा त्रुटी प्रकरणात महावितरणला दणका**

ॲड. महेश धनावत यांनी स्पष्ट केले की, जालन्यामध्ये महावितरणच्या गलथान कारभाराविरोधात आणि ग्राहकांच्या शोषणाविरोधात ग्राहक मंचात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. ग्राहकांना अचानक हजारांच्या घरात चुकीची व सरासरीची बिले पाठवणे, प्रत्यक्ष मीटर रीडिंग न घेणे, वीज कनेक्शन तोडल्यानंतरही अवाजवी बिलांचा तगादा लावणे यांसारख्या सेवा त्रुटी आणि अयोग्य व्यापारी पद्धतींचा अवलंब केल्याप्रकरणी ग्राहक मंचाने महावितरणला अनेक प्रकरणांत दोषी ठरवून दंड ठोठावला आहे. न्यायालयाच्या या चपराकानंतरही महावितरणच्या कारभारात कोणतीही सुधारणा झालेली नाही.

**स्मार्ट मीटरवरून ग्राहकांची अडवणूक**

सध्या जालना शहर व जिल्ह्यात ग्राहकांच्या संमतीशिवाय जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवण्याचे काम सुरू असून, याविरोधात नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. ग्राहकांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता किंवा त्यांना विश्वासात न घेता हे मीटर लादले जात आहेत. यामुळे सामान्य वीज ग्राहकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

''राज्याचे नेतृत्व करणाऱ्या मुख्यमंत्र्यांकडेच ऊर्जा व कायदा ही दोन्ही महत्त्वाची खाती असल्याने महावितरणचे अधिकारी आपण कायद्याच्या वर आहोत अशा अविर्भावात वागत आहेत. जालना ग्राहक मंचाने महावितरणला वेळोवेळी दणका देऊनही चुकीची बिले पाठवणे आणि परस्पर स्मार्ट मीटर बसवणे थांबलेले नाही.''

**ॲड. महेश धनावत, जालना**

**कायदेशीर कारवाईचा इशारा**

महावितरणने मनमानी कारभार तात्काळ न थांबवल्यास आणि ग्राहकांची संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया मागे न घेतल्यास याविरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही *(पान २ वर)*

# फॅक्टरी भाडे अनुदान योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ () व कार्यक्रमाच्या माध्यमातून उत्पादन () क्षेत्रातील सूक्ष्म व लघु उद्योगांना चालना देण्यासाठी ''फॅक्टरी भाडे अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील उद्यम () नोंदणीकृत उत्पादन क्षेत्रातील पात्र सूक्ष्म व लघु उद्योगांना () कारखान्याच्या मासिक भाड्याच्या ३० टक्के किंवा कमाल ₹३० हजार प्रतिमहिना इतके आर्थिक अनुदान देण्यात येणार आहे.

योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये : कारखान्याच्या भाड्यावर ३०% पर्यंत अनुदान. कमाल ₹३० हजार प्रतिमहिना आर्थिक सहाय्य. नव्या उद्योगांना उत्पादन व्यवसाय सुरु करण्यास प्रोत्साहन.उद्योगांच्या उत्पादन क्षमतेत वाढ.रोजगार निर्मितीस चालना.५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी कालावधीपासून कार्यरत उत्पादन उद्योगांना प्राधान्य. पात्रता नोंदणीकृत भाडे करारनामा, ऑनलाइन सुविधा द्वारे भाडे अदा पावतीअर्ज करण्याची अंतिम तारीखः ३१ ऑगस्ट २०२६ *(पान २ वर)*

# तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजनेंतर्गत जिल्हास्तरीय मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ''तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजना'' अंतर्गत सहायक आयुक्त समाज कल्याण, जालना, राजाराम बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, वसुर, सहारा सामाजिक विकास संस्था, चांदई ठोंबरी, ता. भोकरदन, जि. जालना तसेच गरु आशीर्वाद किन्नर समाज चॅरिटेबल ट्रस्ट, जि. जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय मार्गदर्शन कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे शाल व पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास परीविक्षाधीन सहाय्यक जिल्हाधिकारी श्री. रंगामंजू यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी तृतीयपंथीयांच्या सामाजिक सक्षमीकरणासाठी शासनाच्या विविध विभागांनी समन्वयाने कार्य करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. कार्यक्रमामध्ये तृतीयपंथीय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, कायदेशीर हक्क, शिक्षण, आरोग्य, स्वयंरोजगार, कौशल्य विकास, ओळखपत्रे, सामाजिक सुरक्षा तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्याच्या प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती देताना तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण अधिनियम, शासनाच्या कल्याणकारी योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगाराच्या संधी तसेच विविध शासकीय विभागांशी समन्वय साधून लाभ मिळविण्याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. डॉ. संजय राठोड यांनी तृतीयपंथीयांच्या व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास वाढ आणि सामाजिक नेतृत्व या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. कार्यशाळेदरम्यान अहिल्यानगर येथील तृतीयपंथीय प्रतिनिधी श्रीमती दिशा पिंकी शेख यांनी तृतीयपंथीयांच्या विविध समस्या, सूचना व अपेक्षा मांडल्या. त्यांनी तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. यावर संबंधित अधिकाऱ्यांनी शासन नियमांनुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमात तृतीयपंथीयांचे गुरु मोहम्मद शकीफ बक्ष (काजल गुरु नानी) यांनी समाजातील एकजूट *(पान २ वर)*

# राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम

**जालना -प्रतिनिधी**

राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांच्या दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

सकाळी ९.३० वाजता पारनेर, को.प.बं.क्र. १ ता. अंबड जि. जालना येथे बंधाऱ्याची पाहणी. सकाळी १०.०० वाजता घनसावंगीकडे प्रयाण. सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत विमुक्त आणि भटक्या जमाती समुदाय तसेच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करतील. दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत विमुक्त आणि भटक्या जमाती समुदाय राष्ट्रीय नेतेपदी निवड झाल्याबद्दल जाहीर सत्कार सोहळ्यास उपस्थिती. दुपारी ४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय जालनाकडे प्रयाण. दुपारी ४.३० वाजता मृद व जलसंधारण विभागाशी संबंधित विविध विषयानुषंगाने आयोजित बैठकीस उपस्थिती. स्थळ जिल्हाधिकारी कार्यालय, जालना. सायंकाळी ६.०० वाजता शासकीय वाहनाने जिल्हा यवतमाळकडे प्रयाण करतील.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.